Review Of Research

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# लोकशाही सक्षमीकरणामध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका

दत्तात्रय शिवाजी थोरात
सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)
सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते
ता. माळशिरस, जि. सोलापूर (महाराष्ट्र–भारत)

## ● प्रस्तावना :

सद्यकालीन जगामध्ये लोकशाही इतर शासनपद्धतीपेक्षा चांगली असल्याचे जगाने मान्य केले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. त्यामुळे ठराविक राष्ट्रांपुरती मर्यादित असलेली लोकशाही शासनप्रणाली संपुर्ण जगामध्ये विस्तारित झाली. मात्र ती प्रत्येक ठिकाणी यशस्वी झालीच असे नाही. भारतानेही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इंग्लंडचे प्रतिमान असलेली संसदीय शासनप्रणाली स्विकारली, जी लोकशाही प्रधान आहे. पण भारतामध्ये ती अजूनही रूजलेली नाही, असेच म्हणावे लागेल.



प्राचीन भारतामध्ये लोकशाही गणराज्याचे अस्तित्व असल्याचे सांगितले जाते. ती छोटी छोटी नगरे होती. पण गणराज्य होती. नंतर मात्र भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली. यामुळे गणराज्यांचे अस्तित्व नाहीसे होऊन राजेशाही निर्माण झाली. पुढे 15 ऑगस्ट, 1947 ला ब्रिटीश अंमल संपून भारत स्वतंत्र राष्ट्र बनले. 16 जानेवारी 1950 या दिवसापासून ते प्रजासत्ताक गणराज्य बनले. गेल्या सत्तर वर्षात अनेकवेळा यशापयशाचे धक्के सोसत भारतामध्ये ती स्थिर होताना दिसून येत आहे. मात्र पुर्णाशाचे तिचे स्थिरीकरण आणि सबलीकरण भारतामध्ये झाले नसल्याचे आपल्याला मान्य करावे लागेल. सर्वसमावेशक अशी समृद्ध–सबल लोकशाहीची निर्मिती करण्यासाठी प्रसारमाध्यमांची भुमिका महत्वपूर्ण ठरणारी आहे.

## ● भारतीय लोकशाही आणि प्रसारमाध्यमे परस्परसंबंध :

लोकशाही म्हणजे अब्राहम लिंकनच्या व्याख्येप्रमाणे लोकांची लोकांनी लोकांसाठी चालविलेली राज्यव्यवस्था, लोकशाहीत लोक राज्य करीत असतात. त्यामुळे आपले राज्य कसे चालू आहे, जनता सुखासमाधानात आहे की नाही, आपण निर्माण केलेल्या लोकशाही संस्था म्हणजे, संसद, विधिमंडळे, न्यायपालिका, प्रशासन नीट चालू आहेत की नाही. आपण दिलेल्या करातून खजिन्यात जाणारा पैसा योग्य त्या गोष्टींसाठीच खर्च होतो की नाही या व अशा अनेक गोष्टींवर नजर ठेवणे हे लोकशाहीत लोकांचे कर्तव्य ठरते. ही सर्व माहिती लोकांना पुरविण्याचे काम वृत्तपत्रे व इतर माध्यमे करीत असतात. जेथे जेथे लोकांवर अन्याय होतो, गरिबांची पिळवणूक होते, सरकारचे चुकते, पैशांचा अपहार होतो त्या गोष्टी प्रसारमाध्यमे चव्हाट्यावर आणतात. म्हणूनच प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते. विधिमंडळे, न्यायकचेऱ्या, प्रशासन या लोकशाही संस्थांनी लोकांच्या गाऱ्हाण्यांची दखल घेतली नाही तर लोक प्रसारमाध्यमांकडे दाद मागू शकतात. यावरून प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य व समता या मूल्यावरील आधारित असलेल्या लोकशाही समाजातील अनन्यसाधारण महत्व लक्षात येते. प्रसारमाध्यमे म्हणजे लोकशाहीचे राखणदार हे सुत्र सर्वमान्य झाले आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतीय पत्रकारांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात एक मुल्यात्मक भुमिका निभावली होती. राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सामाजिक प्रबोधनाच्या ध्येयवादाने

झपाटलेले पत्रकार बांधिलकीची पत्रकारीता करीत होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही मूल्यव्यवस्था रूजविण्याचे फार मोठे आव्हान राज्यकर्ते, विरोधी पक्ष, समाजधुरीण आणि प्रसारमाध्यमांपुढे आहे. स्वातंत्र्यापर्वीचा ध्येयवाद क्षीण होत जाऊन स्वार्थ आणि हितसंबंधाचे जतन करणाऱ्या मतलबी व्यक्ती, संस्था आणि गटांच्या वातावरणातून आपण जात आहोत. या मुल्य संक्रमणाच्या काळात पत्रकारांनी आपल्या नैतिक मुल्यांचे प्राधान्यक्रम कसे ठरवावेत. नैतिक पेचप्रसंगातून मार्ग कसा काढावा, पत्रकारांनी सत्ता, पैसा, प्रतिष्ठा या दडपणांवर मात कशी करावी ह्या आणि अशा अनेक प्रश्नांची नेमकी उत्तरे देणे तितके सोपे नाही. भारतीय लोकशाही आणि प्रसारमाध्यमांचा परस्पर संबंध पुढील टप्प्यांमधून अधिक निश्चित होत जातो.

## 1. संस्कृती संघर्ष :

मानवी समाजाच्या इतिहासाचे ढोबळपणे चार भाग पडतात.
अ) टोळी संस्कृती, ब) शेती संस्कृती, क) औद्योगिक संस्कृती, ड) संगणक सस्कृती

टोळी युगातून माणसाने शेती युगात प्रवेश केला तेव्हा माणसाचे आचार, विचार, समाज–संघटन, कुटूंब संस्था सारे बदलले. औद्योगिक युगाने शेती संस्कृतीला हादरा दिला आणि माणसाची जीवनशैली बदलून टाकली. आता संगणक क्रांती झपाट्याने पुन्हा मानवी संस्कृती ढवळून काढत आहे. शेती संस्कृतीने संघटित धर्म दिला. कुटूंब व्यवस्था निर्माण केली. औद्योगिक युगात तांत्रिक प्रगती झाली. महानगरे निर्माण झाली. लोकशाही विकसित झाली. जग एकत्र आले. कुटूंब संस्थेला धक्का दिला. संगणक ही नवी व्यवस्थाही बदलून टाकत आहे.

भारताचे वैशिष्ट्ये हे की इथे या चारही संस्कृत्या अजून शेजारी नांदतात. त्यांच्या जीवनशैली, रूढी, परंपरा, कर्मकांडे विविध प्रमाणात कायम आहेत. लोकशाही स्वीकारली असती तरी, सरंजामी मानसिकता अजून सर्व स्तरात मोठ्या प्रमाणात शिल्लक आहेत. जाती–भेदांच्या रूपाने टोळी मानसिकता आहे. परंपरा व रूढींचे संघर्ष आहेत. त्यातून सहाजिकच मोठ्या प्रमाणावर मुल्यांची घुसळण होते.

## 2. विकसनशील लोकशाही :

भारत 1947 मध्ये ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. ब्रिटीश राज्य उदारमतवादी असले तरी ती गुलामगिरीच होती. सार्वभौम देशांच्या नागरीकत्वाचे हक्क भारतीयांना नव्हते. स्वातंत्र्यानंतर भारताने लगेच उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचा स्विकार केला. पाश्चात्य देशात लोकशाहीचा विकास होण्यात दोन शतके गेली व तेथील लोकांना प्रत्येक हक्क झगडून मिळवावा लागला. लोकशाही संस्कृती व समांतर लोकशाही संस्थांच्या विकासाला तेथे पुरेसा वाव मिळाला. भारतीय लोकशाही आता कोठे विकसित होऊ लागली आहे.

देश मुक्त होण्याआधी स्वातंत्र्य चळवळ हेच भारतीय पत्रकारितेचे प्रमुख ध्येय होते. परकियांचे राज्य व नागरी अधिकारांचा अभाव या कारणांनी स्वातंत्र्यपूर्व काळात पत्रकारितेमध्ये व्यवसायिकता येण्यास व पत्रकारितेच्या आधुनिक मुल्यांचा विकास होण्यास संपुर्ण मोकळीक नव्हती. त्यामुळे समाजातील समांतर लोकशाही संस्थांचा, लोकशाही मानसिकतेचा निर्भय व स्वतंत्र्य पत्रकारितेला भक्कम आधार मिळण्यायोग्य परिस्थिती अजून पुरेशी निर्माण झालेली नाही. भारतातील शोध पत्रकारिता अजून बाल्यावस्थेत आहे, हे त्याचे मुख्य कारण आहे.

## 3. भारतीय समाजाची बहुविधता :

अनेक धर्म, पंथ, जाती, वंश, भाषा व प्रादेशिक अस्मिता यांची सरमिसळ असलेला असा भारतीय समाज आहे. त्यामुळे अनेक वेळा वृत्तलेखनामध्ये किंवा विश्लेषणामध्ये कठोर वस्तुनिष्ठता पाळणे अवघड जाते. इतिहास लेखनाबद्दल भारतामध्ये सध्या जो वाद चालू आहे तो या समस्येचे उदाहरण होय. वस्तुनिष्ठ व कठोर संशोधनावर आधारित इतिहास लिहिला तर या बहुजिनसी समाजातील कोणत्या ना कोणत्या गटाच्या भावना दुखावल्या जातात. याचा अर्थ सत्याला धरून असणारा वस्तुनिष्ठ इतिहास बदलून विकृत करता कामा नये. पत्रकारांनाही सामाजिक घडामोडींविषयी लिहिताना तशीच काळजी घ्यावी लागते. पण ही काळजी घेताना वस्तुस्थिती शक्यतोवर दडपून ठेवता कामा नये.

शब्दबध्द केलेल्या निश्चित अशा कायद्याचे राज्य ब्रिटीशांनी आणले.कायद्यासमोर सारेच समान आहेत ही संकल्पनाही आली. त्याआधी भारतीय सरंजामदारी व्यवस्थेत काळजीपूर्वक शब्दबध्द केलेले व समाजाच्या सर्व

व्यवहाराला लागू असलेले कायदे भारतात अस्तित्वात नव्हते. कायद्यासमोर सर्व लोक समान आहेत ही संकल्पनाही नव्हती. त्यामुळे काही लोकांना कठोर शिक्षा तर काहींच्या अपराधाकडे कानाडोळा करण्याची पद्धत सर्रास प्रचलित होती. धर्मग्रथांमधील कायद्यांचे विश्लेषण जो तो आपल्या मनाप्रमाणे किंवा हितसंबंधांप्रमाणे करीत असे. हिंदूंना समाज व्यवहाराने नीतिनियम व कायदे सांगणाऱ्या मनुस्मृतीमध्ये ही विषमता प्रखरपणे दिसते. एखाद्या अपराधाबद्दल कनिष्ठ जातीला प्रखर शिक्षा तर तशाच अपराधाबद्दल वरिष्ठ जातीतील व्यक्तीला मिळमिळीत शिक्षा. कायद्यांची अपूर्णता व अनिश्चितता, विषमतेची उतरंड आणि विशिष्ठ अपराध्यांकडे पाहण्याची उदारबुद्धी या परंपरागत प्रकारांमुळे कायद्याच्या कठोरतेची आणि कायद्यासमोर सर्व नागरिक समान असल्याची संकल्पना भारतीय समाजात पूर्णपणाने यशस्वी झालेली नाही.

### 4. मूल्य संकमणाचा काळ :

मुल्य संक्रमणाच्या मोठ्या खळबळीतून भारतीय समाज जात आहे. तांत्रिक प्रगती आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढ यामुळे गेल्या चार–पाच दशकांत मनुष्य प्राण्याची जीवनशैली बेगाने बदलू लागली आहे. हा बदल भारतात गेल्या दशकातच जाणवू लागला. हा झपाटा एवढा विलक्षण आहे की, त्या वावटळीत जुनी जीवनपध्दती, जुनी मुल्ये कुठल्या कुठे उडून जातात की काय असे वाटू लागले आहे. योग्य ते उपाय न योजल्यास देशातील आर्थिक विषमतेच्या दऱ्या यांत्रिक प्रगती, जागतिक बाजारपेठेची घौडदोड व संगणकाचा वेग यामुळे अधिक खोल व रूंद होत जाचक बनू शकतात. एका बाजूला भारतात लोकशाही मुल्यांचे पोषण होत आहे. संवादाची व माहितीची साधने वाढलयाने सर्व स्तरातील लोकांना आपआपल्या हक्कांची व स्वातंत्र्य समानता, संधीची समानता, इत्यादी मुल्यांची जाणीव होत आहे. राजकीय पक्षदेखील मते मिळविण्यासाठी ही जाणीव करून देत आहोत. त्यामुळे समाजातील श्रीमंत, मध्यम, निम्ममध्यम, आर्थिकदृष्टया कनष्ठि तसेच दारिद्रय रेशेखालील अशा सर्व वर्गीयाच्या आकांक्षा वेगाने वाढत आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा मार्ग स्विकारला. देशातील साधनसंपती पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकास कामांना लावली. धरणे, कालवे, जमीन सिंचन, मोठे उद्योगधंदे, शाळा, कॉलेजे, रूग्णालये, रस्ते वीज, पोलाद, सिमेंट इत्यादी गोष्टींच्या निर्मितीवर देशाने भर दिला. दोन–तीन पंचवार्षिक योजनानंतर त्यांचे फलित दिसून लागले. शेतकऱ्यांमधील चांगल्या जमीनी असलेल्या व सिंचन उपलब्ध झालेला एक वर्ग भरभराटीस येऊ लागला. मध्यमवर्गाच्या शिक्षणाच्या आणि नोकरीच्या संधी वाढल्या. बॅकांचे राष्ट्रीयकरण 1969 मध्ये झाले. काही थोडया व मोठया औद्योगिक व व्यापारी मुठीमध्ये असलेला पैसा त्यामुळे मुक्त होऊन मध्यमवर्गाला, छोटया व्यापाऱ्यांना व कारखानदारांना, आर्थिकदृश्टया दुर्बल घटकांना, विद्यार्थ्यांना सोप्यारितीने कर्ज मिळू लागले. मध्यमवर्गाचे पगार वाढू लागले. त्यांच्या जीवनशैलीत फरक पडू लागला.

अशा या पार्श्वभूमीवर भारताची लोकशाही सबल करण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमीका महत्वाची ठरते. लोकांसमोर वस्तुनिष्ठतेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांची मांडणी होणे अपेक्षित आहे. मात्र भांडवलदारांच्या परिप्रेक्षातून प्रसारमाध्यमे लोकशाहीकडे पाहू लागले तर लोकशाही मुल्यांची घसरण जोरदारपणे घडून येईल यात यत्किंचितही शंका वाटत नाही.

### ● प्रसारमाध्यमे व राष्ट्रवाद राष्ट्रीयत्व :–

जगतिकीकरणामुळे राष्ट्रांच्या सीमा धुसर होत चालल्या आहेत. व्यापार व बाजार देशांच्या सीमा मानीत नाहीत. त्याचप्रमाणे गेल्या काही दशकात पत्रकारितेची व्याप्ती आणि पल्ला एवढा वाढला आहे की उच्च दर्जाच्या पत्रकारितेला राष्ट्रीय सीमांचा अडथळा वाटू लागला आहे. आंतरराष्ट्रीय उलाढाल करणाऱ्या व आपले कारखाने जगभर काढणाऱ्या बडया कार्पोरेट कंपन्यांनी तर जुन्या पठडीतील राष्ट्रवाद केव्हाच मागे टाकला आहे. बी.बी.सी., सी.एन.एन. व यासारख्या जगभर प्रक्षेपण करीत असलेल्या वृत्तवाहिन्या आपण एक जागतिक संस्था आहेत असे समजून जगभराच्या बातम्या तटस्थपणे देण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याप्रमाणे न्युयॉर्क टाईम्ससारखी वृत्तपत्रे आणि रॉयटसारख्या वृत्तसंस्थाही हे काम करीत आहेत. त्यांचे वार्ताहर जणू विश्व नागरिकप्रमाणे वागावे ही कल्पना मूळ धरू लागली आहे.

भारतातही या नव्या बदलांचे परिणाम जाणवू लागले आहेत. काश्मीर व भारत–पाक संबंध या बाबतीतील राजकीय रसायने 11 सप्टेंबर 2001 च्या दहशतवादी हल्ल्यानंतर पुर्णपणे ढवळून निघाली. पाकिस्तानकडे आपण

शत्रू म्हणूनच पाहिले पाहिजे का? काश्मीरवर भारताचा जणू मालकी हक्क असल्यासारखे आपले धोरण असावयास हवे का? काश्मिरींना स्वयंनिर्णयाची मुभा असावयास हवी की नको? पाकिस्तानातील उदारमतवादी शक्तींना आपण पाठींबा द्यावयास हवा की नको?

भारतीय लोकशाही राजकारणावर लिहिणाऱ्या प्रगल्भ विचारवंतांच्या मनात असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतीय जनतेच्या व भारतीय उपखंडाच्या दुरगामी हिताच्या दृष्टीने ते त्यांनी उपस्थित केले. त्यामध्ये अनेक पत्रकारही होते. भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये युध्दासारखी परिस्थिती निर्माण झाली असताना भारतीय पत्रकारांनी असे लिहिणे, सरकारवर टिका करणे, सरकारच्या धोरणांचे वाभाडे काढणे हे राष्ट्रद्रोही कृत्य होय, अशी टीका अनेक देशभक्त नागरिकांनी व केंद्र सरकारातील ज्येष्ठ मंत्र्यांनीही केली. पण पत्रकारांनी त्याकडे लक्ष न देता आपले काम प्रामाणिकपणे चालूच ठेवले.

भारतीय प्रसारमाध्यमांनी हे धाडस व व्यवसाय निष्ठा गेल्या 15 – 20 वर्षात विकसीत केली आहे. निवडणूकींच्या काळात बरीच वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्याही केवळ विश्लेषण वा अग्रलेखांमध्येच नव्हे तर बातम्यांमध्येही एकांगी राजकीय बाजू घेतात. याबाबतीत केवळ ग्रामीण व भाषक वृत्तपत्रेच दोषी असतात असे नव्हे तर बडी इंग्रजी वृत्तपत्रेदेखील या विकृतीतून सुटत नाहीत. इंदिरा गांधींनी 1975 ते 1977 च्या आणीबाणीत वृतपत्र सेन्सॉरशिप लादली त्यावेळी मोठ्या प्रमाणावर संघटनात्मक विरोध करण्याचे धाडस भारतीय पत्रकारांमध्ये नव्हते. बहुतेकांनी शासकीय निर्बंधापुढे मान तुकविली. काही थोडेच पत्रकार निर्भयपणे शासकीय निर्बंध झुगारून देणारे निघाले.

आणीबाणी उठल्यानंतर पत्रकारितेच्या स्वातंत्र्याच जणू स्फोटच झाला. त्या गदारोळात व्यावसायिक नीतीमुल्यांचे अराजक माजणे स्वाभाविकच होते. या काळात पूर्वीपेक्षा वृत्तपत्रांचा राजकीय रंग अधिक गडद झाला. मात्र आणीबाणीत जोरदार धक्का बसल्यानंतर माध्यमांनी स्वातंत्र्याचे महत्व जाणले होते. त्याचबरोबर 1980 च्या दशकात वृत्तपत्रांची संख्या देशभर वाढून त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली. नव्या दमाच्या तरूणांनी साप्ताहिके व नियतकालिके काढून दैनिक वृत्तपत्रांपुढे मोठे अव्हान उभे केले. माध्यम व्यवसायातील उत्पन्न वाढल्याने उच्च शिक्षित व धाडसी तरूण करिअर म्हणून पत्रकारिता व्यवसाय म्हणून स्विकारू लागले. या सर्वांचा परिणाम भारतीय माध्यमांना आपल्या प्रखर स्वातंत्र्याची जाण नव्याने होण्यात झाला. यापुढे आणीबाणीसारखे पत्रस्वातंत्र्यावरील निर्बंध हे नव्या दमाचे पत्रकार कधीही सहन करणार नाहीत असे दिसते.

अमेरिकेत 11 सप्टेंबर 2001 नंतर उठलेल्या वादळात पुष्कळ अमेरिकन पत्रकारही सामील झाले. त्या नव्या वातावरणात अमेरिकन शासनाने कौशल्याने अनेक निर्बंध आणले. जणू काही आपल्या राष्ट्रासाठी हे निर्बंध पाळणे आवश्यक आहे असे समजून माध्यमांनी हे निर्बंध आनंदाने स्विकारले. अल् जजिरा या अरब उपग्रह वाहिनीच्या चित्रफिती दाखविणे शासकीय सल्ल्यानुसार अमेरिकन वाहिन्यांनी बंद केले. इराक युध्दाच्या संदर्भात अल–जजिरा उपग्रह वाहिनीवर अमेरिकेने पक्षपातीपणाचा आरोप केला. अफगाणीस्तानातील हवाई हल्ल्यात जखमी झालेल्या अफगाणी नागरिक, स्त्रिया व मुले यांच्या चित्रफती दाखविणे बंद केले. दहशतवादाविरूध्दच्या युध्दासंबंधी अमेरिकन अधिकृत धोरणाबद्दल मतभिन्नता दाखविणे देशद्रोही होय. असा प्रचार पत्रकारांनीही केला. तु प्रथम अमेरिकन आहेस की पत्रकार अशासारखे प्रश्नही पत्रकारच विचारू लागले. पत्रकाराने न्यायी व बिनचूक असावे या उक्तीचा विस्तार पत्रकाराने न्यायी, बिनचूक व अमेरिकन असावे असा होऊ लागला. अर्थात सर्व अमेरिकन पत्रकार या झंझावती प्रचाराला बळी पडले नाहीत हे खरे. भारतातील पत्रकारिता तुलनात्मकदृष्टया अविकसित असली तरी येथील पत्रकार त्यांच्या अमेरिकन बांधवांपेक्षा अधिक सहजपणे बेगडया राष्ट्रीयत्वाच्या सीमा पार करून अधिक व्यापक अशी नैतिक भूमीका घेऊ शकतात. यात आश्चर्य वाटण्यासारखे नाही. युरोपियन स्थलांतरातून अमेरिका निर्माण झाला असला आणि तेथील काळे – गोरे असा भेद असला तरी अजूनही अमेरिकेत सांस्कृतिक व राजकीय एकजिनसीपणा शिल्लक आहे. त्यामुळे प्रसंग येताच राष्ट्रीयत्वाची भावना प्रखर रूप घेते आणि कधी कधी ती एकांगी फॅसिझमसारखी भयंकारी होऊ शकते. 11 सप्टेंबर नंतर अमेरिकेत राष्ट्रध्वजाचे आणि राष्ट्रप्रेमाचे जे अभूतपूर्व व उत्स्फर्त दर्शन झाले तसेच अध्यक्ष बुश यांना जनतेचा जो प्रचंड प्रतिसाद मिळाला तो जगातील इतर लोकांना थोडसा भयावह वाटला.

भारताचे रसायन वेगळे आहे. भारतासारखा बहुजिनसी समाज जगात दुसरा नाही. राष्ट्रनिष्ठेबद्दल सगळयांचे एकमत असले तरी देशातील प्रत्येक समस्येवर अनेकविध मते–मतांतरे असतात. त्यामुळेच एकसुरी व एकांगी अशा हुकुमशाहीकडे झुकणाऱ्या विचारसरणीचा भारतात सहज स्विाकर होणे कठीण आहे. आणीबाणीचा

अनुभव, वाढती स्पर्धा, चित्रवाणीचा माध्यमातील प्रवेश या घटकांप्रमाणे भारतीय समाजिक व राजकीय वरील वैशिष्टय देखील या एका बाबतीत भारतीय पत्रकांची नैतिक प्रगल्भता विकसित करण्यास कारणीभूत झाले आहे असे म्हणावे लागेल. मात्र ही एक दिशा सोडली तर बाकीच्या क्षेत्रात व्यावसायिक व नैतिक मागासलेपणापासून भारतीय पत्रकारिता मुक्त नाही हे आपण वारंवार पाहतोच. लोकशाही तत्त्वांची पाठराखण प्रसारमाध्यमांनी करण्याची अपेक्षा असते. पण ती संकुचित भावना सोडून तरच सबळ समृध्द लोकशाहीची निर्मिती होईल.

## ● प्रसारमाध्यमांची राजकीय बांधिलकी :–

पत्रकारांना स्वतःची राजकीय विचारसरणी असते. पत्रकारितेतील मुख्य पथ्य असे आहे की, बातमीमध्ये स्वतःच्या मतांना थारा देता कामा नये. बातम्यांच्या स्तरातील वार्ता या बातमीच्या व्याख्येनुसार वस्तुनिष्ठ व काटेकोर व्यावसायिक शिस्तीनुसार असल्या पाहिजे. एखादे वृत्तपत्र विशिष्ट पक्षाची भलावण करणारे असते. त्या पत्रातील बातम्यांचा कल पक्षीय विचारसरणीनुसार वळू लागला की, त्या पत्राची विश्वासार्हता कमी होते. हा जगभराचा अनुभव आहे. महाराष्ट्रात कॉग्रेस पक्षाने 1958 मध्ये विशाल सहयाद्री नवाचे दैनिक काढले. पक्षाने त्याला भरपूर पैसा ओतला. परंतु अनेक प्रयत्न करूनही दैनिक अयशस्वी झाले. बरीच वृत्तपत्रे कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाकडे झुकलेली असतात. त्यांचा कल अग्रलेखावरून व इतर लेखांवरून कळतो. कधी कधी बातम्यांतही दिसतो. पण बातम्यांमध्ये सरसकट पक्षीय रंग येणे कटाक्षाने टाळले जाते. म्हणूनच ही वृत्तपत्रे वाचली जातात.

मुक्त व स्वतंत्र पत्रकारितेत सर्व मत–मतांतरांना यथायोग्य स्थान मिळालया हवे. तेव्हाच माध्यमे खऱ्या अर्थाने निकोप लोकशाही मुल्यांचे संवर्धन करू शकतात. लोकशाहीच्या स्वातंत्र्यादी तत्त्वांसाठी मुक्त व निरपेक्ष भावनेतून लिखाण करणे किंवा दूरचित्रवाणींवर चर्चा घडवून आणणे आवश्यक ठरते. अलिकडे इलेक्ट्रॉनिक मिडीया सगळयाच राजकीय पक्षांना सारखेच महत्व देताना दिसून येत नाही. लोकशाहीच्या विस्तारीकरणासाठी ही गोष्ट घातक ठरल्याशिवाय राहणार नाही.

## ● प्रसारमाध्यमांची सामाजिक बांधिलकी :–

समाजिक बांधिलकीचा प्रश्न अधिक नाजूक आहे. व्यापक समाजहिताची पत्रकाराला बांधीलकी हवीच. परंतु समाजातील विविध गटांच्या ज्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक चळवळी असतात. त्यांची बांधिलकी पत्रकारांनी कितपत ठेवावी हा प्रश्न जरा वादाचा आहे. वस्तुनिष्ठ पत्रकारितेची तडफदारी करणारे पत्रकार असे मानतात की एखाद्या विशिष्ट गटाच्या चळवळीशी मग ती चळवळ कितीही पुरोगामी असो असलेली बांधिलिकी खरा पत्रकारितेला हानिकारक ठरते. कारण असे घट्ट बांधिलकी ठेवणारे पत्रकार त्या त्या चळवळीच्या ध्येयांचे, उद्दिष्टांचे, कार्यक्षमतेचे, परिणामकारकतेचे आणि प्रामाणिकपणाचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करू शकत नाहीत.

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये मात्र काही पत्रकार याच्या उलट बाजू मांडतात. अन्यायग्रस्त, अभावग्रस्त तसेच शोषित व पीडीत समाजगटांचा आवाज क्षीण असतो, त्यांची दुःखे व्यवस्थेची चौकट जेव्हा ऐकून घेत नाही तेव्हा पत्रकारांनीच त्यांची बाजू लावून धरली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. किंबहुना जेथे विषमतेच्या दऱ्या खोल व रूंद आहेत, अशा देशात पत्रकारांचे हे मुलभूत कर्तव्यच ठरते. भारतातील पत्रकारांच्या बऱ्याच गटात ही विचारसरणी लोकप्रिय होती. एक तर स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतरही स्वातंत्र्यचळवळीतील कार्यकर्ते मोठया प्रमाणात पत्रकारितेत शिरले हेही त्याचे कारण आहे. स्वातंत्र्यपूर्वीची भारतीय पत्रकारिता हीच एक चळवळ होती. त्या काळात ते योग्यही होते. पण आधुनिक दृष्टीकोनातून तपासले तर स्वातंत्र्य चळवळीला बांधलकी असलेले सगळेच पत्रकार व्यवसायिक मुल्यनिष्ठेच्या अंगाने आदर्श पत्रकार होते. असे म्हणता येणार नाही. स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा पत्रकारितेला व्यावसायिक वस्तुनिष्ठता अंगीकारणे आवश्यक होते तेव्हाही परंपरेतून आलेली पत्रकारांची चळवळनिष्ठा कायम राहिली. स्वातंत्र्योत्तर काळातील विविध पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते पत्रकारितेत आले. भारतीय सामाजिक मंथनाच्या दृष्टीकोनातून ही गोष्ट स्वागतार्ह असली तरी व्यावसायिक मुल्ये व शिस्त विकसित होण्याला त्यामुळे बाधा आली. खरे म्हणजे व्यावसायिक शिस्तीच्या चौकटीत राहूनही शोषितांच्या, पीडितांच्या दुःखाला आणि त्यांच्यावरील अन्यायाला पत्रकार वाचा फोडू शकतात. किंबहुना तेच त्यांचे कर्तव्य असते पण आंधळी बाजू घेता कामा नये.

प्रसारमाध्यमे आणि समाजातल्या प्रभावी सत्ता यांच्यामध्ये एकनाते असते. माध्यमे अगदीच प्राथमिक अवस्थेत होती. तेव्हाची गोष्ट वेगळी होती. तेव्हा माध्यमांचे तंत्रज्ञानही अगदीच नसल्यागत स्थितीत होते. एखादा विचार पसरायला फारच वेळ लागे. प्रत्यक्ष माणूस ज्या वेगाने फिरणार त्या वेगाने विचार व माहिती पसरणार. आज संगणक क्रांतीने, माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीने सारे जग बदलले आहे. एक मोठी उलथापालथ होत आहे. याच उलथापालथीने इंटरनेट हे एक साधन दिले. या साधनाने प्रत्येक क्षेत्रात अनेक अदलाबदल घडवून आणलेले आहेत. प्रसारमाध्यमे याचा उपयोग कसा करतात हे लोकशाहीच्या दृष्टीने महत्वाचे ठरणार आहे.

## ● भारताची राज्यघटना आणि वृत्तपत्रे स्वातंत्र्य :–

भारतीय राज्यघटनेत वृत्तपत्र स्वातंत्र्याचा स्वतंत्र उल्लेख केलेला नाही. घटना समितीत हा प्रश्न उपस्थित झाला असता हे स्पष्ट करण्यात आले की, वृत्तपत्र स्वातंत्र्य हे नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यात अंतर्भूत आहे. अभिव्यक्तीच्या विविध माध्यमांपैकी वृत्तपत्र एक माध्यम आहे. व्यक्तीला आपले विचार बोलून दाखवण्याचा किंवा लिहून दाखवण्याचा असा अधिकार आहे तसात ते मुद्रित करून घेऊन वितरित करण्याचा अधिकार आहे. वृत्तपत्र स्वातंत्र्य व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे.

वृत्तपत्र स्वातंत्र्य हे व्यक्ति स्वातंत्र्यात समाविष्ट आहे. असे राज्यघटनेत मानण्यात आले आहे. परंतु अलीकडील काळात स्पर्धेचं स्वरूप तीव्र होत गेले आणि प्रसारमाध्यमांनी लोकरंजनाला प्राधान्य द्यावयास सुरूवात केली. दूरचित्रवाहिन्यावरील बातम्या आणि बातम्या देण्यसाठी सुरू झालेल्या स्वातंत्र्य वाहिन्या यांवर बातमी देताना ती लोकांचे शिक्षण करणारी असावी. यावर भर कमी होत होत आहे. बातमी एकदम आकर्षक असावी ती शक्यतो भडक करण्याचा प्रयत्न करावा, याच दृष्टीने वाटचाल चालू आहे. आपले वृत्तपत्र जास्तीत जास्त लोकांनी विकत घ्यावे आणि वाचावे आपली वाहिनी जास्तीत जास्त प्रेक्षकांनी पहावी, यासाठी लोकांना काय अवडेल हा संपादकांनी करावयाच्या निवडीचा प्रमुखच नव्हे तर एकमेव निकष बनू पाहत आहे.

## ● समारोप / निष्कर्ष :–

लोकशाही सक्षमीकरण, सबलीकरण आणि त्यासंदर्भात प्रसारमाध्यमांची भुमीका हा विषय तसा शोध निंबधाच्या चौकटीमध्ये बसविणे अवजड आहे. लोकशाही शासनप्रणालीमध्ये प्रतिनिधीगृह, सरकार आणि न्यायालय यांना जोडून प्रसारमाध्यमांना चौथा खांब म्हणून स्थान देण्यात येते. लोकांचे अधिकार आणि कर्तव्ये काय आहेत? लोकशाहीला घातक ठरणाऱ्या प्रवृत्ती कोणत्या आहेत? याचे ज्ञान सामान्यजनांपर्यंत पाहेचविण्याचे कार्य लोकशाहीत प्रसारमाध्यमे पार पाडीत असतात. हे काम निरपेक्ष भावनेने आणि वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून प्रसारमाध्यमांनी करावे अशी अपेक्षा लोकशाहीत गृहीत धरलेली असते.

संकुचित अस्मितांचे वारे वाहू लागल्यास लोकशाहीचा प्रवास उलटया चक्राने सुरू होतो. म्हणून याबाबतीत प्रसारमाध्यमांची भूमिका आवश्यक ठरते. वास्तव परिस्थितीचे ज्ञान लोकांना माध्यमांद्वारेच समजत असते. हे ज्ञान माध्यमे किती सत्य स्वरूपात देतात त्यावर सर्व गोष्टींचे भवितव्य अवलंबून असते. प्रसारमाध्यमांनी आज व्यक्तिजीवनाच्या प्रत्येक क्षेत्राात प्रवेश केला आहे. किंबहुना सर्व क्षेत्रे व्यापून टाकली आहेत. एखाद्या घटनेबाबतचे जनमत घडविण्याचे/बिघडविण्याचे काम प्रसारमाध्यमेच करीत आहेत. भारतासारख्या विसनशील लोकशाहीत माध्यमांची भुमीका आणखीनच महत्वाची ठरते. कारण भारत बहुविध अस्मितांचे माहेरघर आहे. येथे प्रत्येक बाबतीत विविधता आहेच पण ती सवंर्धितसुध्दा केली जाते.

आधुनिक तंत्रज्ञानाने माध्यमांमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणलेला आहे. जगातील कोणतीही घटना क्षणार्धात जगाच्या प्रत्येक कानोकोपऱ्यात पोहचते आहे किंवा पोहचविली जाते आहे. यामध्ये लोकशाहीच्या सबलीकरणासाठी तिची मुलतत्वे जागतिक समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत योग्य तऱ्हेने पोहोचणे आवश्यक आहे. इतर क्षेत्राप्रमाणेच अनेक चुकीच्या गोष्टी, अस्तित्वाची स्पर्धा माध्यमांमध्येही चालू झाल्या असल्या कारणाने अनेक बाबतीत आज प्रश्नचिन्हे निर्माण झालेली आहेत.

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी वर उल्लेखलेल्या चारीही खांबात परस्पर सामंजस्य असले पाहिजे मात्र संगनमत होता कामा नये. कोणत्या घटनेचा किती प्रमाणात भडकपणा निर्माण करावयाचा याचा विचार माध्यमांनी करण्याची निश्चितच वेळ आली आहे. एकंदरितच लोकशाहीच्या सबलीकरणात आणि याशस्वीतेत प्रसारमाध्यमांची भूमीका निश्चितच महत्वपूर्ण ठरणारी आहे.

● संदर्भ :

मराठी :–

1. चपळगावकर नरेंद्र, विजय काचरे (सं), प्रसारमाध्यमे आणि कायदे, य.च.मु.विद्यापीठ, 2009, नाशिक.
2. देवळाणकर शैलेंद्र, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या प्रकाशन, 2004, औरंगाबाद.
3. देवळाणकर शैलेंद्र, रमेश वानखेडे (सं.), मानवाधिकार, य.च.मु.विद्यापीठ, 2009, नाशिक.
4. पाटील बी.बी., उर्मिला चव्हाण, राजकीय सिध्दांताची मुलतत्वे, फडके प्रकाशन, 2003, कोल्हापूर.
5. भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, 2003, नागपूर.
6. भोळे भास्कर लक्ष्मण, राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे आणि कंपनी, 1988, नागपूर.
7. व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर, राज्यशास्त्र कोश, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, 1980, पुणे.
8. साधू अरूण, रमेश वानखेडे (सं.), पत्रकारितेची नितीमूल्ये, य.च.मु.विद्यापीठ, 2009, नाशिक.

इंग्रजी :–

1. Chaturvedi Archana, Indian Government and Politics, Commonwealth, 2006, New Delhi.
2. Kapur A.C., Principles of Political Science, S. Chand & Company Ltd. 2006, New Delhi.
3. Kundra S., Media Laws and Indian Constitution, Anmol Publications Pvt. Ltd., 2005, New Delhi.
4. Mujawar W.R., Social and Political Movements for Human Rights, Manglam Publications, 2009, Delhi.
5. Mohanty Biswaranjan, Dynamics of Political Theory, The Current Analysis, Atlantic Publishers, 2010, Vol. 1 & 2, New Delhi.